# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 20/02/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा ईसापुर खुर्द येथे दिनांक 16/02/2021 चे 20.30 वा. ते 23.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीमती नर्मदा नागोराव ठाकरे, वय 50 वर्ष, रा. ईसापुर खुर्द यांचा मुलगा आरोपी नामे– नितेश नागोराव ठाकरे, वय 23 वर्ष, रा. ईसापुर खुर्द हा आपले घरी जेवण करीत असतांना होता. त्यावेळी फिर्यादीचा मोठा मुलगा नामे– रोशन नागोराव ठाकरे(मृतक), वय 25 वर्ष हा दारू पिवुन घरी आला व त्याने आरोपीस शिवीगाळ करून त्याचे जेवणाचे ताट फेकुन दिले. या कारणावरून आरोपीने मृतकाला जेवणाचे ताट का फेकले? असे म्हटले तेव्हा मृतकने त्याचे सोबत वादविवाद करून त्याला धक्काबुक्की करत घराबाहेर नेवुन जोरात ढक्कले. मृतक हा त्याचे घरासमोर असलेल्या गाई बांधण्याच्या खुटयाजवळ खडीखुब्याचे गोटयाजवळ उबडा पडला. लगेच तो उठुन आरोपीला मारायला धावला म्हणुन, आरोपीने त्यास पुन्हा जोराने धक्का दिल्याने तो घरासमोरील खडीखुब्याचे गोटयावर पडला. तेव्हा आरोपीने इंधनामधील काडी हातात घेवुन त्या काडीने मृतकास डोक्यावर, छातीवर व चेहऱ्यावर रटटे मारून गंभीर जखमी केले. त्याला उपचाराकरीता सरकारी दवाखाना काटोल येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस ''तु कोणालाही सांगितले तर मी तुला मारल्याशिवाय राहणार नाही व मी पण मरूण जाईल'' अशी धमकी दिली. तसेच मर्ग क्र 14/2021 कलम 174 जाफौ चे चौकशी वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. पाटील 8999941709 हे करीत आहे.

### बनावट चलनी नोटा बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 5 मी. अंतरावर गडकरी चौक सावनेर येथे दिनांक 19/02/2021 चे 20:40 वा. सुमारास आरोपी नामे– प्रकाश लक्ष्मण भानुसे, वय 52 वर्ष, रा. वैशाली नगर, कविता अपार्टमेंट नागपुर हा स्वतःजवळ 500/–रू., 200/–रू., 100/–रू. च्या एकुण 5,800/–रू. च्या अशा एकुण 33 बनावट चलनी नोटा खऱ्या म्हणुन वापरल्या जाव्यात या उद्देशाने स्वतःजवळ बाळगतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ राजेद्र यादव पो स्टे सावनेर यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 489 क भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सागर कारंडे 7722011228 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर